# पुणे शहरामध्ये सार्वजनिक सायकल व्यवस्था धोरण

## १. धोरण

सर्वंकष वाहतूक आराखडा २००८ आणि पुणे सायकल आराखडा २०१७ यामध्ये नमूद केलेल्या वाहतूक ध्येयानुसार (व्हिजन), तसेच मेट्रो रेल प्रकल्पांतर्गत भारत सरकार व महाराष्ट्र राज्य सरकार यांनी नमूद केलेल्या खालील आवश्यक बाबींना अनुसरून;

- पुणे मेट्रोतून जाणाऱ्या व येणाऱ्या प्रवाशांसाठी पूरक वाहतूक व्यवस्था निर्माण होण्याच्या दृष्टीने बिगर-स्वयंचलित वाहतूक साधनांसह विविध प्रकारच्या वाहनांची एकात्मता वाढविण्यास प्राधान्य देणे
- सार्वजनिक सायकल व्यवस्था विकसित करणे
- उपनगरी रेल्वेसह बहुविध वाहतूक साधनांची एकात्मता वाढवणे
- मेट्रो रेल्वे प्रकल्पाची सुरुवातीची व शेवटची कनेक्टीव्हीटी आणि पोहोच सुनिश्चित करणे

पुणे शहरामध्ये सायकलिंग सुरक्षित, आरामदायी, सोयीस्कर आणि संयोजित होण्यासाठी व वाहतुकीच्या साधनांमध्ये सायकलचा वापर वाढवण्यासाठी पुणे महानगरपालिका प्रतिबद्ध आहे. शहरामध्ये सायकलींचा वापर वाढवण्याच्या हेतूने आज जगातील अनेक देशांमध्ये 'सार्वजनिक सायकल व्यवस्थे'चा वापर प्रचलित आहे. याद्वारे शहरात हव्या त्या ठिकाणी व हव्या त्या वेळी सायकली उपलब्ध होऊ शकते. लहान अंतरावरील किंवा एकतर्फी वाहतूक आणि सार्वजनिक वाहतुकीची लास्ट माईल कनेक्टीव्हिटी यांकरिता अशी सायकल सेवा उपयुक्त ठरते.

पुणे महानगरपालिकेचा सार्वजनिक सायकल व्यवस्थेला पाठींबा असल्याचे या धोरणातून निर्देशित केले आहे. सार्वजनिक सायकल सेवा पुढील प्रकारात असू शकेल-

- संपूर्णत: महापालिकेने चालवलेली

# Policy on Public Bicycle Share System for Pune

## 1. Policy

The Pune Municipal Corporation (PMC), as part of its transport vision, as outlined in the Comprehensive Mobility Plan 2008 and detailed in the Pune Bicycle Plan 2017, as well as the requirement stipulated by the Government of India and the Government of Maharashtra with regards to the Metro Rail Project namely,

- To accord high priority for integration of various modes of transport including non-motorized modes, which would act as feeder/evacuation system to the Pune Metro
- Develop a Public Cycle System
- Facilitate multimodal integration including suburban railways
- Ensure that Metro Rail Project provides for first and last mile connectivity and accessibility

is committed to improving the modal share of cycling in the city by making cycling safe, comfortable, convenient and connected.

Worldwide Public Bicycle Sharing (PBS) systems play an important role in enhancing cyclability in a city by making cycles available when and where needed. They can help to cater to short, one-way and last mile connectivity trips.

The Pune Municipal Corporation, through this policy states its support for PBS systems. PBS systems may be

- Fully supported and run by the city
- Run privately without any financial support of the city
- Run privately with some aid (financial or otherwise) by the city

| | |
|---|---|
| • आर्थिक सहाय्य महापालिकेचे आणि सेवा चालवण्याची जबाबदारी खाजगी चालकांची<br>• सेवा चालवण्याची जबाबदारी खाजगी चालकांची आणि काही प्रमाणात पालिकेची मदत (आर्थिक अथवा इतर)<br><br>प्रवाशांची गरज आणि बाजारातील उपलब्धता या दोन्हींचा विचार करून महानगरपालिका वरील सर्व शक्यतांचा विचार करेल आणि निर्णय घेईल.<br><br>सार्वजनिक सायकल सेवा शहरात सर्वत्र उपलब्ध करणे आणि ही सेवा चांगल्या गुणवत्तेची, किफायतशीर आणि सर्व स्तरारील लोकांना वापरता येईल या खबरदारी घेणे, हे ध्येय आहे. | The PMC will explore the possibility of all of the above, based on market availability and keeping in mind the needs of commuters.<br>The aim is to ensure that a PBS system serves the entire city, with a good quality of service at affordable rates and which is accessible to all segments of society. |
| २. खाजगी चालकांसाठी धोरण<br><br>पुणे महानगरपालिकेचे धोरण खुले अ◌ाहे ('एक्स्लुझिव्ह' वा विशेष करार केले जाणार नाहीत). शहरामध्ये सार्वजनिक सायकल सेवा व्यवस्था उभी करणे व ती चालवणे या कामांसाठी खाजगी चालकांचेही स्वागत आहे.<br><br>संपूर्णत: स्वयंचलित सार्वजनिक सायकल सेवा चालवण्याची तयारी असलेल्या कंपन्यांना प्रथम पुणे मनपाशी करार करावा लागेल, ज्यामुळे त्यांना इतर विभागांशी समन्वय राखून आपले काम करणे शक्य होईल. | 2. Policy for Private Operators<br><br>The PMC will have an open policy (no exclusive contracts) and welcomes private operators to set-up and run PBS systems in the city.<br><br>Companies that are desirous of operating a fully automated PBS system are **encouraged** to sign a Memorandum of Understanding (MoU) with the PMC to ensure support for their operations and to facilitate coordination with various other agencies. |

## ३. सार्वजनिक मालकीच्या व सार्वजनिकरित्या चालवलेल्या व्यवस्थांचे धोरण

खाजगी चालकांकडून दिल्या जाणाऱ्या सेवांची पुणे मनपाकडून वेळोवेळी पडताळणी केली जाईल. जर शहरामध्ये खाजगी चालकांच्या सेवा उपलब्ध नसतील (शहराच्या काही भागात किंवा सर्वत्र), किंवा जर खाजगी चालकांकडून दिल्या जाणाऱ्या सेवांचा लाभ समाजाच्या सर्व स्तरारील लोकांना मिळू शकत नसेल, त्यांचे दर जास्त असतील किंवा सेवेचा दर्जा योग्य नसेल, तर सर्वांची सेवेपर्यंत पोहोच सुनिश्चित करण्यासाठी, खाजगी चालकांच्या सेवेबरोबर किंवा स्वतंत्रपणे पुणे मनपाकडून सार्वजनिक सायकल सेवा उभारली व चालवली जाईल. खा

जगी-सार्वजनिक भागीदारी तत्वाने किंवा काम गतीमान होण्याच्या दृष्टीने आवश्यक अन्य स्वरूपात खाजगी चालकांना त्यांच्या सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी पुणे मनपा सहाय्य करू शकेल.

## 3. Policy for a Publicly owned and Operated System

The PMC will assess from time to time the services being offered by private vendors in the city in the aggregate. In the circumstances that privately-run services are not available in the city (in part or in whole), or the services provided through private operators are not accessible to all segments of society, are unaffordable or of poor quality, the PMC shall set-up and run a PBS system, in addition to existing operators or exclusively, so that these services are available to all citizens.

The PMC shall also explore the possibility of supporting private operators to enhance the level of service or a PPP or any other arrangement as deemed necessary and expedient.

## ४. सार्वजनिक सायकलींची शहरातील लक्ष्याधारित सेवा

पुणे सायकल आराखड्याला अनुसरून येत्या तीन वर्षात सार्वजनिक सायकल सेवेचा स्तर खाली नमूद केल्याप्रमाणे उंचावण्याचा पुणे मनपाचा प्रयत्न असेल.

1. सार्वजनिक सायकल व्यवस्थेतील सायकलींची संख्या
   a. १०० रहिवाशांमागे ३ सायकली किंवा शहरात एकंदर १ लाख सायकली

2. सार्वजनिक सायकल व्यवस्थेतील सायकलींच्या फेऱ्यांची संख्या
   a. प्रत्येक सायकलीच्या दर दिवशी ४ फेऱ्या किंवा दर दिवशी सार्वजनिक सायकल व्यवस्थेतील सायकलींच्या ४ लाख फेऱ्या

सदर बाबींमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी सुधार / बदल करण्यात येतील.

## 4. Target Level of Service (LoS) for PBS in the city

It shall be the endeavour of the PMC to reach the following level of service by PBS, in accordance with the Pune Bicycle Plan, over the next 3 years.

1. No. of PBS cycles
   a. 3 cycles for every 100 residents or about 1 lakh cycles in the city in aggregate

2. No. of PBS cycle trips
   a. 4 or more trips per cycle per day or about 4 lakh PBS cycle trips per day

These targets shall be revised from time to time.

## ५. सायकल झोन

सध्याच्या बाजारपेठेमध्ये संपूर्णत: स्वयंचलित असलेली 'डॉकलेस' यंत्रणा उपयुक्त ठरेल, ज्यामध्ये स्मार्टफोन किंवा तत्सम तंत्रज्ञानाच्या वापराने वापरकर्त्या / सदस्य ग्राहकास सायकलींचे कुलुप उघडता येते, सायकल घेऊन हव्या त्या ठिकाणी गेले की त्या ठिकाणी सायकलला कुलूप लावून ती ठेवून देता येते, कुलूप लावले की सायकल फेरी संपल्याचीही नोंद होते.

कोणत्याही ठिकाणी सायकल सोडण्याची व्यवस्था करणे दूरगामी दृष्ट्या जिकिरीचे जाईल. म्हणूनच पुणे मनपाने शहराच्या विविध भागात 'सायकल झोन' निश्चित करावेत.

i. पुणे मनपाने पादचारी मार्ग किंवा तत्सम सार्वजनिक ठिकाणी जमिनीवर रंगांच्या सहाय्याने हे झोन चिन्हांकित करावेत. या झोनमुळे इतर वाहतुकीला अडथळा येणार नाही याची खबरदारी जागा ठरवताना घ्यावी.
ii. हे झोन सायकल मार्गांचा एक भाग असावेत, म्हणजे त्याठिकाणी स्वयंचलित गाड्या उभ्या केल्या जाणार नाहीत, आणि केल्या असता त्यांच्यावर मुंबई महापालिका अधिनियम आणि मोटार वाहन कायदा याखाली पुणे मनपाने किंवा वाहतूक पोलीस किंवा आरटीओ यापैकी योग्य यंत्रणेकडून दंडात्मक कारवाई केली जावी.
iii. या झोनचा वापर सार्वजनिक सायकल व्यवस्थेतील सायकली किंवा खाजगी सायकली पार्किंगसाठी सामायिकपणे व्हावा.
iv. या झोनमध्ये सायकली पार्क करण्यास शुल्क आकारले जाऊ नये.
v. आवश्यकता असल्यास सार्वजनिक सूचना फलक लावावा, ज्यामध्ये सार्वजनिक सायकल व्यवस्थेची माहिती द्यावी, आणि त्याची संरचना व आकारमान निश्चित करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांवर सोपवावेत.
vi. महानगरपालिकेकडून जोवर संरचना उभी केली जात नाही, तोवर आणि महापालिका आयुक्तांच्या मंजुरीने व परवानगीने सार्वजनिक सायकल व्यवस्था चालकांना झोनलगत तात्पुरते माहिती फलक, किंवा महापालिकेची परवानगी असल्यास, विहित

## 5. Bicycle Zones

The current market favours a "dockless" system, wherein the cycles are unlocked (usually by a smartphone or such technology, which is vendor-specific), ridden by the user/subscriber, and left at the destination and locked by the user to signify the end of the trip. The entire system is "automated".

The ability to leave the cycles at any location may cause nuisance in the long run. To address this issue the PMC shall designate "**bicycle zones**" throughout the city.

These zones –

i. Shall be marked by simple paint marking on the pavement or other such publicly accessible area determined by the PMC which shall not pose an impediment or obstruction to other commuters
ii. Shall be designated as being part of the "cycle track", so that no motorized vehicle shall be legally allowed to occupy this space and in such case, shall attract penal provisions and actions under both the Maharashtra Municipal Corporations Act and Motor Vehicles Act by the PMC or Traffic Police or RTO as appropriate
iii. Shall be for the shared use for parking of cycles belonging to the PBS Operator or privately-owned cycles
iv. Cycles parked in these zones shall not be levied any parking charges or fees
v. Shall have a public display board, if necessary, which shall contain exclusively information about the PBS systems, and shall have such dimensions and structure as shall be determined by the Commissioner
vi. The PBS vendor shall be allowed to temporarily place any information board, until such time that the Corporation does

नियमानुसार विशिष्ट आकारमानाचे कायमस्वरूपी माहिती फलक लावण्याची परवानगी द्यावी.

vii. पुणे मनपा आवश्यकतेप्रमाणे या झोनचे स्थलांतर करू शकते.

viii. स्पष्टपणे नियुक्त केलेल्या सायकल झोनमध्ये सायकल पार्कींगची सोय करण्यास प्राधान्य असावे, मात्र जिथे अशा प्रकारचे पार्कींग झोन निश्चित केलेले नसतील, तिथे रस्त्यांलगत सायकल पार्कींगला परवानगी द्यावी. यामुळे जोवर इतर वाहतुकीला / वाहनांना अडथळा निर्माण होत नाही तोवर ही परवानगी दिली जावी.

ix. या योजनेचा प्रसार करण्यासाठी पुणे मनपाने रहिवासी संघटना, सोसायटी, व्यापारी संघटना, कार्यालय संकुले, मेट्रो प्राधिकारी, बस डेपो, मॉल इत्यादींसोबत समन्वय साधून त्यांच्या सहाय्याने शहरामध्ये विना-शुल्क सायकल पार्कींग झोन नियुक्त करावेत.

या सायकल झोनमधूनच बहुतेक सायकली घेतल्या व दिल्या जातील याची खबरदारी चालकाने घ्यावी. परंतु, 'डॉकलेस' पद्धतीने सायकल व्यवस्था राबवताना काही वेळी झोनव्यतिरिक्त अन्य ठिकाणीही सायकली ठेवल्या जाऊ शकतात. अशा वेळी सायकली ठेवताना त्यामुळे इतर वाहतुकीला गैरसोय वा अडथळा होणार नाही याची काळजी घेतली जावी. असे झाल्यास त्याची माहिती मनपाकडून संबंधित चालकाला दिली जाईल, आणि माहिती मिळाल्यानंतर विशिष्ट वेळात या सायकली दुसऱ्या योग्य त्या ठिकाणी नेण्याची जबाबदारी चालकाची असेल.

जर सूचना देऊनही चालकाने सायकली हालवल्या नाहीत, आणि त्यांचा वाहतुकीला अडसर होत राहिला, तर त्या उचलून नेण्याचे आणि चालकाला योग्य तो दंड आकारण्याचे अधिकार महापालिकेला राहतील. परंतु अशा दंडात्मक कारवाया शक्यतोवर केल्या जाऊ नयेत आणि महापालिकेने चालकाशी सौहार्दाने या समस्यांचे निवारण करावे.

शहरातील सायकल झोनच्या जागांची माहिती पुणे मनपाने अद्ययावत ठेवावी आणि त्याची सूचना वाहतूक पोलिसांना वेळोवेळी पाठवावी.

not affix a structure, with approval and permission of the Commissioner

vii. Shall be relocated if required or deemed necessary by the PMC

viii. While the designated bicycle zone shall be the preferred parking space in the city, in locations where there are no such identified parking zones, the bicycles shall be allowed to be parked off-road ill such time the same does not pose an impediment or obstruction to other commuters / vehicles.

ix. To promote the scheme Corporation shall work with Resident Welfare Associations, Societies, market associations, office complexes, metro authorities, bus depots, malls etc. in the city to encourage provision of designated bicycle parking zones at no parking fees to promote adoption of the scheme.

The PBS vendor shall endeavour to ensure that most cycles are picked up and dropped off at these bicycle zones. However, given the nature of the "dockless" system, it is possible that cycles may also be placed outside these zones. In such cases, the cycles should not be placed in such manner as shall cause inconvenience or obstruction to other commuters.  The Corporation shall intimate the Operator in such cases, who shall, within a specified time period, re-locate such cycles.

The Corporation shall also have the power to remove such cycles in the event the Operator has failed to do so despite intimation, if they cause a continued obstruction to other commuters, and levy an appropriate charge on the vendor. However, the Corporation shall as far as possible, avoid such actions and work amicably with the operator to address such issues.

The PMC shall maintain the location of all such bicycle zones in the city and which shall be updated and provided to the Traffic Police for notification from time to time.

| | |
|---|---|
| ६. सुरक्षा<br>विविध देशात जिथे जिथे सार्वजनिक सायकल सेवा कार्यरत आहेत तिथे सर्वत्र जाणवणारी एक समस्या म्हणजे सायकलींची चोरी किंवा मोडतोड. आपल्या व्यवस्थेतही या समस्या येण्याची शक्यता गृहीत धरावी लागेल. तसेच सार्वजनिक सायकल व्यवस्थेच्या सार्वजनिक जागेत असलेल्या मालमत्तेला, 'सार्वजनिक मालमत्ता' मानून, त्याचे रक्षण होईल याची खबरदारी पुणे मनपाने पोलिसांच्या सहकार्याने घ्यावी. मनपा आणि पुणे यांनी संयुक्तपणे दक्षतेच्या उपाययोजना करून अशा दुर्घटना होणार नाहीत याची काळजी घ्यावी, घटना झाल्यास गुन्हेगारांना शासन करावे, आणि सार्वजनिक सायकल व्यवस्था ही आपल्या शहराची शान आहे, महत्त्वपूर्ण सोय आहे हा संदेश जाणीवजागृतीतून समाजामध्ये रूजवावा.<br><br>मनपा व पोलिसांनी चालकांशी वेळोवेळी समन्वय साधून चोरी व मोडतोडीच्या घटनांची वेळोवेळी पडताळणी करावी, आणि समस्या निवारणासाठी आवश्यक कारवाई करावी. चालक व स्थानिक प्रशासन यांच्याशी समन्वय साधून सुरक्षा योजनेचे व्यवस्थापन करण्यासाठी पुणे मनपाने एका नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करावी आणि सदर काम करणारी स्वतंत्र टीम तयार करावी.<br><br>सार्वजनिक सायकल व्यवस्थेसारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल समाजात जागृती निर्माण करणे, या योजनेला पूरक सामाजिक वर्तन व्हावे यासाठी लोकांचे प्रबोधन करणे अशा स्वरूपाचे कार्यक्रम या टीममार्फत राबवले जावेत. | 6. Security<br>One of the key concerns worldwide for PBS systems is the occurrence of theft or vandalism. While the PBS system must take into account some levels of both, the PMC with the cooperation of the Police, shall endeavour to ensure the safety of PBS system assets that are in public spaces, by treating them as "public property".<br><br>The PMC and the Police shall work together to control such incidences by being vigilant, nab and prosecute offenders, and inculcate a sense of pride and ownership for PBS in the city through outreach and awareness campaigns.<br><br>The PMC and Police will coordinate with PBS vendors on a regular basis to assess incidences of theft and vandalism and take such steps as necessary to address the issue. |
| ७. विमा<br>शहरातील सायकल चालकांसाठी विमा सुविधा उपलब्ध करण्याची शक्यता पुणे मनपाने तपासावी आणि याबाबत आवश्यक निर्णय घ्यावेत. | 7. Insurance<br>The PMC shall explore the possibility of insurance coverage for all cyclists in the city and take appropriate decision in this matter. |

| | |
|---|---|
| ८. जाहीरात<br>सार्वजनिक सायकल व्यवस्था चालकांना सायकलींवर जाहिराती लावण्यास परवानगी द्यावी, मात्र या जाहिराती सायकल सांगाड्याच्या बाहेर येतील अशा प्रकारे लावलेल्या नसाव्यात. सामाजिकदृष्ट्या अनिष्ट अथवा तंबाखू वा दारू सारख्या उत्पादनांच्या जाहिरातींना परवानगी दिली जाऊ नये. कोणकोणत्या जाहिराती / आशय अमान्य असतील हे ठरवण्याचे अधिकार आयुक्तांना असतील, यावर ते वेळोवेळी निर्णय घेतील. | 8. Advertisement<br>PBS system vendors shall be allowed to place advertisements on the cycle, but which do not extend or protrude from the body of the cycle. Advertisements that are offensive to the public or which display tobacco or alcohol shall not be permitted. The Commissioner shall be empowered to determine list of non-permissible content from time to time. |
| ९. सुरक्षितता<br>चालकांनी शहरामध्ये सेवा सुरू करताना व राबवताना योग्य त्या सुरक्षा उपाययोजनांचे पालन करावे. सुरक्षेची खबरदारी घेणे सर्वोच्च महत्त्वाचे असले पाहिजे. यादृष्टीने सायकली योग्य दर्जाच्या आणि मान्य मापदंडांच्या असल्या पाहिजेत, विशिष्ट कालावधीने त्यांची दुरुस्ती देखभाल केली गेली पाहिजे आणि सायकल चालकांच्या सुरक्षेला कोणताही धोका संभवणार नाही अशा प्रकारे काळजी घेतली गेली पाहिजे. | 9. Safety<br>PBS system vendors shall ensure that they implement and follow appropriate safety and security measures while rolling out and managing the programme in the city. Safety is of prime importance and accordingly the operators need to ensure that the bicycles used are of the right quality and in compliance with the standards; and there is periodic maintenance carried out to ensure safety and user experience of the riders. |
| १०. योग्य वापर व्हावा यादृष्टीने वापरकर्त्यांना मार्गदर्शन<br>सायकलींचा वापर व पार्कींग शिस्तशीर होण्यासाठी सार्वजनिक सायकल व्यवस्थेच्या चालकांनी विविध माध्यमातून माहिती प्रसार करावा. सायकलींचा वापर, हाताळणी व पार्किंग याकरिता योग्य पद्धतींचा अवलंब केला जावा याकरिता नागरिक व सायकल चालकांना प्रोत्साहन द्यावे. | 10. User Guidance on right usage<br>PBS system vendors shall actively promote disciplined bike parking and usage through their platforms/other media and incentivise users/ citizens to adopt right practices in terms or parking, riding and bike handling. |